बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी व व्यंगचित्रकार होते. सामना या मराठी दैनिकाचे ते संस्थापक तथा मुख्य संपादकही होते. त्यांची हिंदुहृदय सम्राट म्हणूनही लोकांच्या हृदयांवर छाप उमटली आहे. हा वाचा, श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा त्यांच्या आठवणी जागविणारा माहितीपूर्ण लेख

पान २ वर



दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२७५ ■ गुरूवार, दि. २३ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रुपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -275 ■ Thursday, 23 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## दारुच्या नशेत बापानेच केली मुलाची हत्या

**नाशिक :** दारूच्या नशेत बाप लेकाच्या झालेल्या भांडणात बापाने स्वतःच्या मुलाला जीवे ठार मारले. उपनगर पोलीस ठाण्यात गेल्या चौथ्या दिवशी दुसऱ्या खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत परिसरातील नागरिकांनी सांगितले की, अनिल विठ्ठल गुंजाळ (वय २०) राहणार आम्रपाली झोपडपट्टी, उपनगर कॅनल रोड,असे बापाच्या हल्लयात मृत्युमुखी पडलेल्या दुर्दैवी मुलाचे नाव आहे.

विठ्ठल गुंजाळ व त्यांचा मुलगा अनिल गुंजाळ यांचे रोज नशेमध्ये भांडण होत असत.गेल्या महिन्याभरात दहा ते पंधरा वेळा एकमेकाची हाणामारी होत होती. काल रात्री बाप लेक प्रचंड नशेत असताना त्यांच्यात वाद झाले. बापाने मुलगा अनिल याच्या डोक्यावर जड वस्तूने मारल्याने तो बेशुद्ध झाला. त्यास नागरिकांच्या मदतीने बिटको रुग्णालयात व त्यानंतर जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र आज सकाळी तो मयत झाला असल्याचे उपनगर पोलिसांनी सांगितले. हल्लेखोर बाप विठ्ठल गुंजाळ याला तात्काळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम दुपारपर्यंत सुरू होते. अधिकचा तपास पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ सचिन बारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजीव फुलपगारे करीत आहे. गंधर्व नगरी या ठिकाणी रविवारी संध्याकाळी एका आठ वर्षीय मतिमंद मुलावर अतिप्रसंग करून त्याचा खून केल्याची घटना घडली होती. पोलिसांच्या याबाबतचा तपास सुरू असतानाच दुसऱ्या खुनाचा गुन्हा घडला.

## रिलायन्ससोबत ३ लाख कोटींचा ऐतिहासिक करार, ३ लाख रोजगार संधी - मुख्यमंत्री

दावोस : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत हे दावोस दौऱ्यावर आहेत. दावोस येथे पहिल्याच दिवशी ५ लाख कोटींची गुंतवणूक केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन आणि बालासोर अलॉयज लिमिटेड यांच्यात ऐतिहासिक सामंजस्य करार झाला. बालासोर अलॉयज ही जगातील अग्रगण्य उच्च-कार्बन फेरोक्रोम उत्पादक कंपनी आहे. दरम्यान महाराष्ट्र सरकारने रिलायन्ससोबतही करार केला आहे. यामुळे महाराष्ट्रातील तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकोनॉमिक फोरम) पहिल्या दिवशी महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ६ लाख २५ हजार ४५७ कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सामंजस्य करारांच्या व्यतिरिक्त विविध कंपन्यांच्या प्रमुखांच्या भेटी घेतल्या आणि त्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी निमंत्रित केले. टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांचीही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. टाटा समूह ३० हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे.

महाराष्ट्र सरकारने रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने ३ लाख ५ हजार कोटी रुपयांचा ऐतिहासिक सामंजस्य करार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून याबद्दल माहिती दिली.अनंत अंबानी यांच्या नेतृत्वाखाली नवीन ऊर्जा, किरकोळ विक्री, आतिथ्य आणि उच्च तंत्रज्ञान उत्पादन यासह विविध क्षेत्रांमध्ये ३ लाखांहून अधिक रोजगार संधी निर्माण झाल्याचे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

यावेळी अनंत अंबानी यांनी विकसित भारताच्या उभारणीतील परिवर्तनकारी प्रयत्नांबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आर.आय.एल. नवीन भारताच्या उभारणीत योगदान देण्यास वचनबद्ध असल्याचे अनंत अंबानी यावेळी म्हणाले. महाराष्ट्राला भारताच्या ५ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेकडे नेण्याच्या प्रयत्नाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. भारत लवकरच पहिली ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## प्रजासत्ताक दिन : मुख्य शासकीय सोहळा देवगिरी मैदानावर

छत्रपती संभाजीनगर - देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन समारंभाचा जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी या मैदानावर रविवार दि.२६ रोजी सकाळी सव्वा नऊ वा. आयोजीत करण्यात आला आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. या कार्यक्रमास सर्व स्वातंत्र्यसेनानी, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी आदींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे. मुख्य शासकीय समारंभात लोकांना सहभागी होता यावे यासाठी सकाळी साडेआठ ते दहा यावेळात ध्वजारोहणाचा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजीत करण्यात येऊ नये. त्यांनी हे समारंभ सकाळी साडेआठ पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावे,असे अपर आयुक्त सामान्य प्रशासन डॉ. अरविंद लोखंडे यांनी कळविले आहे.

# जळगाव रेल्वे दुर्घटनेत १२ जणांचा मृत्यू! आग लागल्याच्या भीतीने प्रवाशांच्या ट्रेनमधून उड्या, समोरून येणाऱ्या रेल्वेने उडवलं

**जळगाव (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जळगावमध्ये रेल्वेने काही प्रवाशांना उडावल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुष्पक एक्स्प्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या काही प्रवाशांनी आग लागल्याची भीतीने ट्रेनमधून खाली उड्या मारल्या. मात्र याच वेळी समोरुन येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने या प्रवाशांना उडवलं. यामध्ये १२ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. तर १९ प्रवासी जखमी झाले आहेत.

**११ मृत्यू ४ जण गंभीर जखमी**

गुलाबराव पाटील यांनी सांगितलं की मृतांपेकी चार जणांचे मृतदेह पाचोरा येथे आहेत. तर आठ मृतदेह हे जळगावला पाठवण्यात आले आहेत. तसेच चार लोक गंभीर जखमी आहेत, त्यांना वृंदावन या खाजगी रुग्णालयात उपचार केले जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात जळगाव- मुंबई रेल्वे मार्गावर माहिजी आणि पारधाडे स्थानकादरम्यान ही भीषण दुर्घटना घडली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रेल्वे अपघातात एकूण १२ जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय चार प्रवासी गंभीर जखमी आणि १६ किरकोळ जखमी आहेत. सर्व जखमींना जळगावसह पाचोरा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृत आणि जखमी प्रवाशांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते.

**मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत**

जळगाव रेल्वे अपघातातील मृतांच्या कुटुंबांना राज्य सरकारकडून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे. तसेच जखमींचा संपूर्ण उपचार मोफत करण्यात येणार आहे.

**गुलाबराव पाटील काय म्हणाले?**

परधाडे गावाजवळ ही घटना घडली आहे. रेल्वे रुळ ओलांडताना ही दुर्घटना घडल्याचे काही लोकांचे म्हणणे आहे. तर काही लोकांचे म्हणणे आहे की आग लागल्याच्या अफवेने लोकांनी उड्या मारल्या. १५ ते २० मिनिटात प्रांत अधिकारी आणि कलेक्टर घटनास्थळी पोहचत आहेत. घटनास्थळी पोहचायला जळगावहून ३० ते ४० मिनिटं लागतात. पण जोपर्यंत इथं कोणी जाणार नाही तोपर्यंत हे लक्षात येणार नाही, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी टीव्हा९ शी बोलताना दिली.

जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी काय सांगितलं?

या दुर्घटनेबद्दल जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी माहिती देताना सांगितले की, मध्य रेल्वेच्या कंट्रोल रुमकडून माहिती देण्यात आली की, कर्नाटक एक्सप्रेसबरोबर एक अपघाताची घटना घडली, ज्यामध्ये ७ ते ८ लोकांचा जागीच मृत्यू झाला.





त्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून आपण तात्काळ रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवल्या. प्रांत अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिस अधिकारी देखील पोहचले आहेत.रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी देखील दुर्घटनेनंतर मदतकार्य करत आहेत.

ग्रामीण रुग्णालय, खाजगी रुग्णालय आणि शासकिय वैद्यकीय महाविद्यालय या तीन रुग्णालयाकडून मदत घेतली जात आहे. त्यामध्ये सर्व रुग्णांना मदत केली जात आहे असेही प्रसाद म्हणाले. प्राथमिक माहितीनुसार, ६ ते ८ चा आकडा सांगितला जात आहे. अजून अधिकृत आकडेवारी मिळालेली नाही. सध्या आपली प्राथमिकता जखमींना उपचार देण्याची आहे, असेही आयुष प्रसाद म्हणाले.

**रेल्वे आधिकाऱ्यांने सांगितलं नेमकं काय झालं?**

मध्य रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील निला यांनी अपघाताबद्दल माहिती देताना सांगितले की, जळगावमध्ये लखनऊहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेने येणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये पाचोरा स्टेशनजवळ, अलार्म चेन पुलिंगची घटना घडली. या घटनेनंतर काही प्रवासी ट्रेनमधून खाली उतरले होते. त्याच वेळी विरुद्ध दिशेने जात असलेली कर्नाटक एक्स्प्रेस गाडी तेथून जात होती जिचा काही प्रवाशांना ट्रेनची धडक दिल्याची माहिती आम्हाला मिळाली.

ते पुढे बोलताना म्हणाले की, ङ्गप्राथमिक माहितीनुसार, ७ ते ८ प्रवासी जखमी झाले आहेत, त्यांच्या उपचारासाठी आम्ही जवळच्या रुग्णालयांची मदत घेतली आहे. कर्नाटक एक्स्प्रेसने आपला पुढील प्रवास पुन्हा सुरू केला आहे आणि जखमी प्रवाशांना मदत मिळाल्यानंतर लगेच पुष्पक एक्स्प्रेस देखील आपला प्रवास पुन्हा सुरू करेल.

## जळगावातील अपघाताची घटना अत्यंत वेदनादायी, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची प्रतिक्रिया

जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील परधाडे गावाजवळ मोठा रेल्वे अपघात घडला आहे. बंगळुरू एक्स्प्रेसने अनेकांना उडवल्याची प्राथमिक माहिती मिळाली. पुष्पक एक्स्प्रेस गाडीने अचानक ब्रेक मारल्याने चाकांमधून ठिणग्या उडाल्या. त्यानंतर आग लागल्याची अफवा पसरली आणि रेल्वेतील प्रवाशांनी उड्या मारल्या. मात्र विरूद्ध बाजूने येणाऱ्या रेल्वे लाईनवरून येर्णाया बंगळुरू एक्स्प्रेसने या प्रवाशांना उडवले. जळगावच्या परधाडे रेल्वे स्थानकाजवळ बुधवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली आहे. या घटनेची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे असं म्हटलं आहे. या घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना पाच लाख रुपयांची मदतही जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या घटनेबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

जळगाव जिल्ह्यात पाचोरा येथे परधाडे रेल्वे स्थानकानजिक रेल्वे अपघातात प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. मी मृत्यू पावलेल्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून या अपघाताची माहिती घेतली. यावेळी जखमी प्रवाशांना तातडीची मदत व मोफत वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले. मंत्री गिरीश महाजन स्वत: घटनास्थळी पोहोचले असून जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षकांसह जिल्हा यंत्रणा युद्धपातळीवर बचाव आणि मदतकार्य राबवत आहे. जिल्हा प्रशासन आणि रेल्वे यंत्रणा समन्वयानं बचाव व मदतकार्य करीत आहेत. मदतकार्य रात्रीही सुरु राहणार आहे. त्यासाठी ग्लासकटर, फ्लडलाईट्सह आवश्यक यंत्रणा अपघातस्थळी पोहोचली आहे.ङ्ख असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

# जळगाव रेल्वे दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्र्यांकडून ५ लाखांची मदत जाहीर

**जळगाव :** बंगळुरू एक्सप्रेसच्या धडकेत जळगाव जवळील परांडा रेल्वे स्थानकाजवळ तब्बल ११ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. जळगावहून मुंबईला जाणाऱ्या पुष्पक एक्सप्रेसला आग लागल्याच्या भीतीने काही प्रवाशांनी चालत्या गाडीतून उड्या मारल्या. मात्र, त्याचवेळी समोरुन येणाऱ्या बंगळुरु एक्सप्रेसच्या खाली चिरडल्याने या प्रवाशांचा दुर्दैवी अंत झाला. दरम्यान मुख्यमंत्र्यांनी अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे की, पाचोरानजीक एका अत्यंत दुर्दैवी घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय वेदनादायी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, ङ्गमाझे सहकारी मंत्री गिरीश महाजन तसंच पोलीस अधीक्षक हे घटनास्थळी पोहोचले असून, जिल्हाधिकारी काही वेळात तेथे पोहोचत आहेत. संपूर्ण जिल्हा प्रशासन रेल्वे प्रशासनाच्या समन्वयाने काम करीत असून, जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात येत आहेत. ८ रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत. सामान्य रुग्णालय तसंच नजीकच्या इतर खासगी रुग्णालयांना जखमींवर उपचारासाठी सज्ज ठेवण्यात आलं आहे. ग्लासकटर, फ्लडलाईट्स इत्यादी आपातकालिन यंत्रणा सुद्धा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. संपूर्ण स्थितीवर आम्ही लक्ष ठेऊन असून, आवश्यक ती सर्व मदत तातडीने पुरविण्यात येत आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात आहे.



या अपघातानंतर जखमींना जवळच्या दवाखान्यात हलवण्यात येत आहे. जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ङ्गअपघातातील सहा ते सात प्रवासी आहेत त्यांना बंगळुरु कर्नाटक एक्सप्रेसने उडवलं आहे.

या दुर्घटनेच्या ठिकाणी मदत आणि बचावकार्य सुरु केलं आहे. सात ते आठ प्रवाशांचा मृत्यू झाल्याचं समजतं आहे असंही जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. जखमींना आम्ही तातडीने ग्रामीण रुग्णालयासह एकूण तीन रुग्णालयांमध्ये दाखल करतो आहोत. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी ही माहिती दिली आहे. तसंज जळगावच्या सिव्हील हॉस्पीटलच्या डीनने ११ मृतदेह रुग्णालयात आणल्याचं तसंच ४० जखमींवर उपचार सुरू असल्याची माहिती दिली आहे.

दिल्लीतील रेल्वे बोर्डाच्या माहिती आणि प्रसिद्धी विभागाचे कार्यकारी संचालक दिलीप कुमार यांनी म्हटलं की, काही प्रवाशांनी पुष्पक एक्सप्रेसमध्ये साखळी ओढली आणि ट्रेनमधून खाली उतरले.

बेंगळुरू-नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेस दुसऱ्या बाजूने येत होती. आम्हाला काही प्रवाशांना धडक बसल्याने गंभीर दुखापत झाल्याची माहिती मिळाली आहे. अनेक लोक भुसावळहून ट्रेनमध्ये चढले होते आणि त्यापैकी एकाने अलार्म चेन ओढली. त्यानंतर, ते ट्रेनमधून खाली उतरले आणि चुकीच्या पद्धतीने रुळ ओलांडण्याचा प्रयत्न केला किंवा रुळांवर उभे होते. यामुळे त्यांना ट्रेनने धडक दिली. भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापक घटनास्थळी रवाना झाले आहेत, वैद्यकीय पथक तेथे आहे, स्थानिक प्रशासन देखील तेथे आहे. रेल्वेचे वरिष्ठ विभाग अभियंता देखील तेथे आहेत. इतर वरिष्ठ डॉक्टर आणि रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात आली आहे. मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, जळगाव टीमचा मला फोन आला, मी लगेच तिकडे निघालो असून १० ते १२ जण या अपघातात दगावल्याची माहिती आहे. ही घटना खूप दुर्दैवी असून घटनेसंदर्भातील माहिती प्रत्यक्षदर्शी गेल्यावरच मिळेल. अपघातातील जखमींना मदत व उपाचारासाठी सर्वतोपरी काम केले जाईल.

पाचोऱ्यापासून १५ ते २० मिनिटांच्या अंतरावर ही घटना घडली असून तेथील रुग्णालयात जखमींवर उपचार केले जातील, त्यासाठीची तयारी रुग्णालयाकडून करण्यात आली आहे, अशी माहिती यांनी दिली.

मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, मी जिल्हाधिकारी यांच्यासोबत बोललो असून रेल्वे स्थानकावर ट्रेन उभी होती, तेव्हा लोहमार्ग क्रॉस करताना ही दुर्दैवी घटना घडल्याचे समजते, मात्र हे निश्चित नाही.

## स्वातंत्र्य लढ्याचा महानायक

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पराक्रमी इतिहासात डोकावले तर एक असामान्य महापुरुष म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नाव डोळ्यांसमोर येते. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अहिंसात्मक मार्ग न स्वीकारता सशस्त्र लढा देऊनच देशाला स्वातंत्र्य मिळेल हे जाणून त्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आझाद हिंद सेनेची स्थापना केली आणि देशाला स्वातंत्र्य देण्यात हातभार लावला. अशा या महानायकाची जयंती २३ जानेवारीला देशभरात सर्वत्र साजरी होत आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिसा या राज्यात कटक या गावी झाला होता. जानकीनाथ बोस आणि प्रभावती दत्त हे त्यांचे माता-पिता. त्यांचे वडील हे सुप्रसिद्ध वकील होते. नेताजी सुभाषचंद्र बोस हे लहाणपणापासूनच एक कट्टर देशभक्त होते. त्यांच्या नसानसांत देशभक्ती भिनली होती. पारतंत्र्याच्या काळात ङ्गतुम मुझे खुन दो, मै तुम्हे आझादी दुंगाङ्घ हे त्यांनी भारतीयांना केलेले आवाहन खूपच उपयुक्त ठरले. लहानपणी, नेताजी सुभाषचंद्र बोस कटकमध्ये रॅवेन्शॉ कॉलेजिएट हायस्कूल नामक शाळेत शिकत होते. या शाळेत त्यांच्या एका शिक्षकाचे नाव वेणीमाधव दास होते. वेणीमाधव दास आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे स्फ्फुल्लिंग जागवत. त्यांनी सुभाषमधली सुप्त देशभक्ती जागृत केली. वयाच्या १५व्या वर्षी, नेताजी सुभाषचंद्र बोस गुरूच्या शोधात हिमालयात गेले होते. गुरूचा हा शोध असफ्फल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून, नेताजी सुभाषचंद्र बोस त्यांचे शिष्य बनले. महाविद्यालयात शिकत असताना, अन्यायाविरुद्ध लढण्याची त्यांची प्रवृत्ती प्रखर झाली. कोलकाता येथे प्रेसिडेन्सी महाविद्यालयात इंग्रज प्राध्यापक ओटेन हे भारतीय विद्यार्थ्यांशी उर्मटपणे वागत असत. म्हणून सुभाष यांनी महाविद्यालयात संप पुकारला होता. इंग्लंडमधील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी इंग्लंडमध्ये राहून इंग्रज सरकारची नोकरी करण्यास नकार दिला व ते मायदेशी परतले.

आपल्या सार्वजनिक जीवनामध्ये सुभाषबाबूंना एकूण ११ वेळा कारावास भोगावा लागला. १९२१ मध्ये त्यांनी ६ महिन्यांचा कारावास भोगला. सुभाषबाबूंचे अनेक क्रांतिकारकांबरोबर मैत्रिपूर्ण संबंध होते आणि स्वातंत्र्य लढ्यात त्यांना क्रांतिकारकांची मदत होती. त्यामुळे ते क्रांतिकारकांचे स्फ्फुर्तिस्थान आहेत असे ठरवून इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना त्यांच्यावर कोणताही खटला न चालवता अनिश्चित कालखंडासाठी मंडालेच्या कारगृहात बंदिस्त केले. मंडाले कारागृहात सुभाषबाबूंची तब्येत बिघडली, त्यांना क्षयरोगाने ग्रासले; परंतु इंग्रज सरकारने त्यांची सुटका करण्यास नकार दिला; परंतु नंतर तुरुंगातच सुभाषबाबूंचा मृत्यू होईल असे वाटल्याने त्यांची कारागृहातून सुटका केली. तुरुंगात असतानाच सुभाषबाबूंची कोलकाताचे महापौर म्हणून निवड झाल्याने सरकारला त्यांची सुटका करणे भाग पडले. वरील प्रकृती अस्वस्थेनंतर त्यांनी युरोपमध्ये जाऊन उपचार घेण्याचे ठरविले. १९३३-१९३६ या काळात युरोपमध्ये त्यांचे वास्तव्य होते. युरोपमधील वास्तव्यात सुभाषबाबूंनी स्वत:च्या तब्येतीची काळजी घेत असतानाच देशकार्यही सुरूच ठेवले. या वास्तव्यात त्यांनी इटलीचे नेते मुसोलिनी यांची अनेकदा भेट घेतली. मुसोलिनी यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यास सर्व सहकार्य देण्याचे वचन दिले. याच काळात आयर्लंडचे नेते व्हॅलेरा सुभाषबाबूंचे मित्र बनले आणि त्यांनीही स्वातंत्र्य लढ्यास पाठिंबा दिला.

भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या प्रयत्नांबाबत सुभाषबाबूंचे महात्मा गांधी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबर मतभेद होते. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यातील अपयशानंतर ब्रिटिशांनी देशभर ब्रिटिश राज घोषित करून सर्व यंत्रणांचा ताबा घेतला होता. स्वातंत्र्यासाठी होणारी सर्व आंदोलने मोडून काढण्यासाठी ठिकठिकाणी गोळीबाराचा वापर केला आणि त्यात असंख्य देशभक्तांना जीव गमवावा लागला. महात्मा गांधींच्या अहिंसेच्या प्रयत्नांना यश येणार नाही. स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढाच द्यावा लागेल. हे जाणणारा एकच दृष्टा, देशभक्त, नेता आणि सेनानी, देशभक्त सुभाषचंद्र बोस यांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी काँग्रेस पक्षाचा त्याग केला आणि ३ मे १९३९ रोजी ‘फ्फॉरवर्ड ब्लॉक’ या नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला आणि सैन्यातून निवृत्त झालेले सैनिक आणि पोलीस अधिकारी यांना एकत्र करून त्यांनी ‘आझाद हिंद सेने’ची स्थापना केली आणि ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र लढा देण्यासाठी प्रयत्न केले. त्याचाच एक भाग म्हणून ब्रिटिशांवर दबाव आणण्यासाठी त्यांनी दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांना पराभूत करणाऱ्या जपान आणि जर्मनी या दोन देशांशी संधान बांधले आणि त्यांचा चळवळीस पाठिंबा मिळवला. त्यांच्या मदतीने स्वराज्याची क्रांतिकारी चळवळ प्रखर केली. आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी इतर राष्ट्रांचे लक्ष वेधून घेतले. त्यांची आझाद हिंद सेना अखेर ब्रह्मदेशातून आसामच्या सीमेवर उभी ठाकली. त्यानंतर ब्रिटिशांनी भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेतला आणि स्वतंत्र्य भारतीय प्रजासत्ताक लवकरच अस्तित्वात आले. नेताजींचे स्वातंत्र्य लढ्यातील अतुलनीय योगदान पाहता ते भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे खरेखुरे महानायक होते असेच म्हणावे लागेल. अशा या महानायकाला कोटी कोटी प्रणाम.

# हिंदुत्ववादाची ‘एकदम कडक’ भूमिका

**(२३ जानेवारी: बाळासाहेब ठाकरे जयंती सप्ताह विशेष)**

**बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी व व्यंगचित्रकार होते. सामना या मराठी दैनिकाचे ते संस्थापक तथा मुख्य संपादकही होते. त्यांची हिंदुहृदय सम्राट म्हणूनही लोकांच्या हृदयांवर छाप उमटली आहे. हा वाचा, श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा त्यांच्या आठवणी जागविणारा माहितीपूर्ण लेख... संपादक.**




बाळासाहेबांनी दि.१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. त्यांच्या मते समाज सुधारकांची समृद्ध परंपरा असलेला महाराष्ट्र पुरोगामी आहे, परंतु मराठी माणूस मागेच राहिला. महाराष्ट्रात सुविधा आहेत, मात्र मराठी माणूस दुविधेतच. महाराष्ट्रात उद्योग आहेत, पण मराठी तरुण बेरोजगार! तर महाराष्ट्रात पैसा आहे, परंतु मराठी माणूस गरीब आहे. महाराष्ट्राला भारतात मान आहे, मात्र मराठी माणूस महाराष्ट्रातच प्रामुख्याने मुंबईत अपमानित होत आहे. शिवसेनेचा पहिला मेळावा याच वर्षी ३० ऑक्टोबरला शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. ज्यात लाखो लोकांचा सहभाग होता. या मेळाव्यापासूनच त्यांची आणि शिवतीर्थावरील- शिवाजी पार्कवरील मराठी माणसांची गर्दी यांच्यामध्ये नातेसंबंध प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली. त्यांनी सर्वप्रथम एक व्यंगचित्रकार म्हणून सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. इ.स.१९५०मध्ये ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. पुढील काळात त्यांनी ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर. के.लक्ष्मण यांच्यासमवेतही काही काळ काम केले. फ्री प्रेस जर्नलमध्ये काम करीत असतानाच ते विविध संस्था, कंपन्या व नियतकालिके यांसाठी चित्रे, व्यंगचित्रे, जाहिरातीचे डिझाइन अशी कामे करीत असत. त्यांच्या व्यंगचित्रात इंदिरा गांधींची व्यक्तिरेखा आवडती होती.

बाळासाहेबांचा जन्म महाराष्ट्र राज्यातील मराठी विद्या व संस्कृती यांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात दि.२३ जानेवारी १९२६ रोजी झाला. हिंदूंच्या पूजापाठ व अंधश्रद्धावर कडाडून प्रहार करणारे प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे त्यांचे वडील आणि रमाबाई या त्यांच्या प्रेमळ मातोश्री होत. महाराष्ट्राचे सांप्रत मुख्यमंत्री मा.उद्धवजी ठाकरे हे त्यांचे सुपुत्र तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.राजजी ठाकरे हे त्यांचे पुतणे आहेत. महाराष्ट्रातील राजकारणात बाळासाहेबांचा प्रचंड दबदबा निर्माण झाला होता. झुणका भाकर केंद्रांची योजना, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बेचे मुंबई नामकरण अशा अनेक योजना-प्रकल्पांची मूळ संकल्पना ही त्यांचीच होती. व्हॅलेंटाईनडेसारख्या पाश्चिमात्य उत्सवांना विरोध, परप्रांतीयांच्या तसेच बांगलादेशींच्या विरोधातील आंदोलने यांमागचा विचारही त्यांचा होता. त्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचा वाघ असे संबोधले जात होते. आज त्यांच्या जयंतीच्या मंगल प्रसंगी समस्त कार्यकर्ते व शिवसैनिक ‘कोण आला रे, कोण आला? महाराष्ट्राचा वाघ आला!‘ अशा आरोळ्या ठोकत त्यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होतात. बाळासाहेबांनी नोकरी सोडून स्वत:चे व्यंगचित्रात्मक साप्ताहिक काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार त्यांनी ऑगस्ट १९६०मध्ये मार्मिक हे साप्ताहिक सुरू केले. साप्ताहिकास मार्मिक हे नाव त्यांना वडील प्रबोधनकारांनीच सुचविले होते. मराठीतील हे पहिले व्यंगचित्र साप्ताहिक ठरले. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र स्थापन झालेला असतानाही प्रामुख्याने मुंबईत मराठी माणसावर अन्याय होत होता. या प्रश्नाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रात येऊन मराठी माणसाबद्दल अनादर बाळगणाऱ्यांना त्यांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून टीका केली. इ.स.१९६०पासून ते राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य स्तरावरील प्रत्येक महत्त्वाच्या घडामोडीत, तसेच इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर मराठी लोकांना मार्गदर्शन करत. ते श्याम या बालपाक्षिकाचे सुद्धा संपादक होते. वक्तृत्वाबरोबरच ठाकरे भेदक लेखन देखील करत. प्रबोधनकार केशव ठाकरे व प्रल्हाद केशव अत्रे यांचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो. शिवाय व्यंगचित्रकाराची वेधक-वेचक निरीक्षणदृष्टीही त्यांच्यामध्ये होती. सामना हे केवळ शिवसेनेचे मुखपत्र आहे, ज्यात संपादक म्हणून बाळासाहेबांचे अग्रलेख असत.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

बाळ ठाकरे हे हिंदुत्ववादी होते. बाँबस्फोट, देशविघातक कृत्ये घडवणाऱ्या धर्मांधांना या देशात राहण्याचा अधिकार नाही. मतपेटीचे राजकारण करत अशा मुस्लिमांचे लांगुलचालन कोणी करू नये. भारताला आपला देश मानणाऱ्या राष्ट्रवादी मुस्लिम लोकांना आपला कोणत्याही प्रकारचा विरोध नाही, असे विचार त्यांनी मांडले. हिंदुत्ववादी भूमिकेमुळे त्यांना शिवसैनिकांनी हिंदुहृदय सम्राट अशी पदवी दिली. त्यांनी दिलेली गर्व से कहो, हम हिन्दु है, ही घोषणाही त्यांच्या राजकारणाचा महत्त्वाचा भाग होती. बाळासाहेब ठाकरे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन दि.१७ नोव्हेंबर २०१२ रोजी मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी त्यांनी चिरनिद्रा घेतली. त्यांच्या पश्चात बरोबर दहा वर्षांनी एकसंध प्रबळ शिवसेनेचे दोन गट पडले आहेत. हे बघून त्यांच्या आत्म्याला असह्य वेदना झाल्या नसतील कशावरून?

!! बाळासाहेब ठाकरेजींना त्यांच्या जयंती सप्ताह निमित्त कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक सुभाषबाबू

**(२३ जानेवारी १८९७ – १८ ऑगस्ट १९४५). भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक नेते आणि आझाद हिंद सेनेचे सरसेनापती. ‘नेताजी’ ही त्यांना लोकांनी दिलेली उपाधी. सुभाषबाबूंचे घराणे मूळचे माहिनगरचे (बंगाल). त्यांचे वडील जानकीनाथ वकिलीच्या व्यवसायानिमित्त कटकला (ओरिसा) आले. तेथेच सुभाषचंद्रांचा जन्म झाला. आई प्रभावतीदेवींनी बालवयात त्यांच्यावर केलेले संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत महत्त्वाचे आहेत. रॉवेंशा विद्यालयाचे मुख्याध्यापक बेनी माधवदास यांचाही त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला.**

सुभाषबाबूंवर स्वामी रामकृष्ण आणि विवेकानंद यांचा फ्फार मोठा प्रभाव शाळेत असतानाच पडला होता. दोघांच्या अनेक ग्रंथांचे वाचन त्यांनी तेव्हा केले होते. मिशन शाळेत गोऱ्या व हिंदी विद्यार्थ्यांमध्ये करण्यात येणारा भेदाभेद आणि विवेकानंदांचे लिखाण यांमुळे राष्ट्रप्रेम निर्माण झाले व पुढे गोऱ्यांच्या उद्दाम वर्तनाचे (उदा., प्रा. ओटन) प्रसंग अधिकाधिक घडले तसतसे ते वाढत गेले. याउलट विवेकानंद-रामकृष्णांच्या ग्रंथांमुळे त्यांना अत्यंत उत्कट अशी धार्मिक ओढ वाटू लागली. वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच ते कटक आणि नंतर कलकत्त्याला भेटणाऱ्या साधू, बैरागी, योगी इत्यादींना प्रश्न विचारून त्यांच्याकडून आपल्याला खरा मार्ग सापडेल का, याचा शोध घेऊ लागले. ध्यान, हटयोग यांतही त्यांना गोडी वाटू लागली. विषयासक्तीवर पूर्ण नियंत्रण मिळवून साक्षात्कार प्राप्तीचा मार्ग दाखविणारा कोणी गुरू त्यांना या दोन्ही शहरांत भेटला नाही.

कॉलेजमधील पहिले वर्ष संपल्यानंतरच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत सतराव्या वर्षी ते आणि त्यांच्यासारखे त्यांचे चारपाच मित्र गुरूच्या शोधार्थ निघाले. गया, काशी, हरद्वार, हृषिकेश, मथुरा, वृंदावन, दिल्ली, आग्रा इ. ठिकाणी ते सर्वजण हिंडले; परंतु हवा असलेला गुरू तर मिळाला नाहीच उलट तीर्थक्षेत्री जातिपातीचे प्रस्थ, शिवाशीव इ. पाहून त्यांचा भ्रमनिरास झाला. विवेकानंदांच्या शिकवणुकीने त्यांची मानवाच्या समानतेवरील श्रद्धा दृढ झाली.

प्रा. ओटन यांच्या व तशाच एका गोऱ्या प्राध्यापकाच्या उर्मट वर्तवणुकीने अपमानित झालेल्या प्रेसिडेंट कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हरताळ पुकारला. त्याचे नेतृत्व स्वीकारणे सुभाषबाबूंना भाग पडले. पुढील आयुष्याचे वळण लागण्याची ही नांदी होती; पण या प्रकरणी त्यांना महाविद्यालयातून काढून टाकण्यात आले. पुढे अशुतोष मुखर्जींच्या मदतीने त्यांना स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला (१९१७). ते तत्त्वज्ञान विषय घेऊन पहिल्या वर्गात बी.ए. झाले (१९१९). त्याच वर्षी वडिलांच्या इच्छेनुसार ते आयब. सी.एसब.साठी इंग्लंडला गेले. त्या वेळी असहकार आंदोलन सुरू झाले नव्हते. जालियनवाला बाग येथे काय घडले, त्याची पूर्ण कल्पना पंजाब बाहेरच्या लोकांना आली नव्हती. परीक्षेत यश मिळाल्यानंतर हळूहळू सर्व गोष्टी उजेडात आल्या. आंदोलन सुरू झाले, तेव्हा त्यांनी पहिली सत्तीची एक वर्षाची उमेदवारी न करता सरळ नोकरीचा राजीनामा देऊन स्वदेशाची वाट धरली (१९२१). या वेळी महात्मा गांधींच्या असहकार चळवळ जोरात होती. त्यांची भेट घेऊन पुढील दिशा समजावून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महात्मा गांधीनीच त्यांना कलकत्त्याला चित्तरंजन दासांकडे (१९२१) पाठविले. मृत्यूपर्यंत सु. चार वर्षे सुभाषबाबूंचे राजकीय गुरू चित्तरंजनच होते. या सुमारास इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ्फ वेल्सच्या कलकत्त्यामधील आगमनावर बहिष्कार टाकण्याची मोहीम आखण्यात आली. सुभाषबाबूंनी तीत पुढाकार घेतला (१९२१). त्यात त्यांना चित्तरंजन दासांबरोबर सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. तुरुंगात दासांच्या पुरोगामी विचारांचा सुभाषबाबूंवर फार मोठा



परिणाम झाला. कारावासानंतर ते काही दिवस बेंगॉल नॅशनल महाविद्यालयाचे प्राचार्य आणि स्वराज्य या वृत्तपत्राचे संपादक होते. पुढे चित्तरंजन दास कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर झाल्यावर सुभाषबाबूंकडे मुख्य अधिकाऱ्याची जबाबदारी आली. ब्रिटिश सरकारने सूडबुद्धीने खोटा आरोप लादून ऑक्टोबर १९२४ मध्ये त्यांना स्थानबद्ध केले. बंगाल प्रांतिक परिषदेमध्ये क्रांतिवीर गोपीनाथ सहा (जो पुढे फ्फाशी गेला) याचा जाहीर गौरव करण्यात आला होता. परिषदेस स्वतंत्र पक्षाचे म्हणजे कौन्सिलमध्ये काम करणाऱ्या काँग्रेस गटाचे बहुसंख्य लोक होते. त्यांनीच बंगाल कौन्सिलचे कार्य अशक्य करून टाकले होते. त्यांना खच्ची करण्यासाठी फ्फार व्यापक धरपकडी झाल्या व सर्वांवर, दहशतवादी आंदोलनाशी संबंधित असल्याचे आरोप करण्यात आले. सुभाषबाबूंना अलीपूर, बेऱ्हामपूर, कलकत्ता इ. शहरांतील तुरुंगात काही काळ ठेवून पुढे मंडाल्यासही पाठविण्यात आले. कारावासात त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र, मानसशास्त्र इ. विविध विषयांचे वाचन केले.

दरम्यान चित्तरंजन दास यांचे निधन झाल्याचे त्यांना समजले (१९२५). अशक्त प्रकृती व क्षयाचा विकार यांमुळे सुभाषबाबूंना मुक्त करण्यात आले (१९२७). भारतातील राजकीय परिस्थितीचा सु. सहा महिने अभ्यास करून नंतर ते सक्रिय राजकारणात पडले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेस परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यांनी यूथ लीग स्थापन करून तरुणांना संघटित केले. काँग्रेसचे सरचिटणीस म्हणूनही जवाहरलाल नेहरूंबरोबर त्यांची नियुक्ती झाली (१९२८). दोघांनी मिळून इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना केली (१९२८). त्याच वर्षी कलकत्ता येथील अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष मोतीलाल नेहरू यांनी वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणारा ठराव काँग्रेस अधिवेशनात मांडला. जवाहरलालांसह सुभाषबाबूंनी त्यास विरोध केला आणि पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडावा असे सुचविले. पुढे १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या वेळी सुभाषबाबूंना पुन्हा अटक झाली.

२३ जानेवारी १८९७ हा दिवस जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. या दिवशी स्वातंत्र्य चळवळीचे महान नेते सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कटक येथील प्रसिद्ध वकील जानकी नाथ आणि प्रभावती देवी यांच्या पोटी झाला. इंग्रजांच्या दडपशाहीच्या निषेधार्थ त्यांच्या वडिलांनी ’रायबहादूर’ ही पदवी परत केली. त्यामुळे सुभाषच्या मनात इंग्रजांबद्दल कटुता रुजली.

**प्रविण बागडे**
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravinbagde@gmail.com

आता सुभाष यांनी इंग्रजांना भारतातून हुसकावून लावण्याची आणि भारताला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा घेतली आणि राष्ट्रवादाच्या मार्गावर चालू लागले. आयसीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सुभाष यांनी आयसीएसचा राजीनामा दिला. या गोष्टीवर त्यांच्या वडिलांनी त्यांचे मनोबल वाढवले आणि सांगितले - ’तुम्ही देशसेवेचे व्रत घेतले आहे, तेव्हा या मार्गापासून कधीही विचलित होऊ नका.’

डिसेंबर १९२७ मध्ये काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस बनल्यानंतर १९३८ मध्ये त्यांची काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली. ते म्हणाले होते- महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आपण स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे ही माझी इच्छा आहे. आमचा लढा केवळ ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्ध नाही, तर जागतिक साम्राज्यवादाविरुद्ध आहे. हळुहळू सुभाष यांचा काँग्रेसशी भ्रमनिरास होऊ लागला.

१६ मार्च १९३९ रोजी सुभाष यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्य चळवळीला नवा मार्ग देत सुभाष यांनी तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न पूर्ण निष्ठेने सुरू केला. त्याची सुरुवात ४ जुलै १९४३ रोजी सिंगापूर येथे झालेल्या ’भारतीय स्वातंत्र्य परिषदे’ने झाली.

५ जुलै १९४३ रोजी ’आझाद हिंद फ्फौज’ची औपचारिक स्थापना झाली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी आशियातील विविध देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांची परिषद भरवून आणि तात्पुरते स्वतंत्र भारत सरकार स्थापन करून स्वातंत्र्य मिळवण्याचा आपला संकल्प पूर्ण केला.

१२ सप्टेंबर १९४४ रोजी रंगूनच्या ज्युबली हॉलमध्ये हुतात्मा यतिंद्र दास यांच्या स्मृतीदिनानिमित्त नेताजी यांनी अतिशय भावविभोर भाषण केले आणि ते म्हणाले - ’आता आपले स्वातंत्र्य निश्चित आहे, परंतु स्वातंत्र्य बलिदानाची मागणी करते. तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन. भारताच्या इतिहासातच नव्हे तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेलेले हे वाक्य देशातील तरूणाईत प्राण फुंकणारे होते.

१६ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजींचे विमान टोकियोला निघताना तायहोकू विमानतळावर कोसळले आणि १८ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र भारताच्या अमरत्वाची घोषणा करणारे, भारतमातेचे लाडके नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कायमचे निधन झाले, देशभक्तीचा दिव्य प्रकाश प्रज्वलित करून अमर झाले.

# एका दिवसांत दोघांच्या आणि जानेवारीत सहा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या

कोटा : स्पर्धा परीक्षांच्या खासगी कोचिंग क्लासचे केंद्र अशी राजस्थानमधील कोटा शहराची ओळख आहे. या कोटा शहरात एका दिवसांत दोन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. यंदा जानेवारी महिन्यात अवघ्या २२ दिवसांत कोटामध्ये सहा विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे. ताजी घटना जेईई मेन्स परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्याशी संबंधित आहे. तो एका खासगी कोचिंग क्लासमध्ये शिकत होता. नैराश्यातून त्याने आत्महत्या केल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

कोटामधील आत्महत्यांमुळे आता कोचिंग क्लासचा कारभार कसा सुरू आहे याच्या सखोल चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे. चौकशीसाठी कोटा प्रशासनावरील नागरिकांचा दबाव वाढू लागला आहे.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार कोटातील जवाहर नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महावीर नगर फर्स्ट भागात जेईई मेन्स परीक्षेची तयारी करत असलेल्या खासगी कोचिंग क्लासच्या विद्यार्थ्याने आत्महत्या केली. याआधी जवाहर नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतच एका गुजराती विद्यार्थिनीने आत्महत्या केली. विद्यार्थिनीने गळफास लावून घेतला आणि जीवन संपवले. ही विद्यार्थिनी गुजरातमधील अहमदाबादची होती. ती सहा महिन्यांपूर्वी कोटामध्ये आली होती. राजीव नगरमधील एका हॉस्टेलमध्ये राहून ती नीट परीक्षेची तयारी करत होती. विद्यार्थिनीचा मृतदेह हॉस्टेलमधील पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला.

पोलिसांनी विद्यार्थिनीच्या आत्महत्येचा तपास सुरू केला आणि काही तासांतच जेईई मेन्स परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचे वृत्त आले. इंजिनिअरिंगच्या प्रवेशासाठी जेईई मेन्स परीक्षा सुरू झाली आणि पहिल्याच दिवशी विद्यार्थ्याने आत्महत्या केली. आत्महत्या करणारा विद्यार्थी आसाममधील नागावचा रहिवासी आहे.

**कोटामध्ये १ जानेवारी २०२५ ते २२ जानेवारी २०२५ दरम्यान सहा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या**

- पहिली आत्महत्या ८ जानेवारी हरियाणातील महेंद्रगडचा नीरज
- दुसरी आत्महत्या ९ जानेवारी मध्य प्रदेशमधील गुना जिल्ह्यातील अभिषेक लोधा
- तिसरी आत्महत्या १५ जानेवारी ओडिशातील अभिजीत गिरी
- चौथी आत्महत्या १८ जानेवारी राजस्थानमधील बुंदी जिल्ह्यातील मनन जैन
- पाचवी आत्महत्या २२ जानेवारी गुजरातमधील अहमदाबादची अफ्शा शेख
- सहावी आत्महत्या २२ जानेवारी आसाममधील नागावचा पराग.

# कुटुंब समाज आणि राष्ट्र ही साखळी मजबूत झाली तर राष्ट्राची उन्नती सहजपणे होईल- मोहनजी पुराणिक

## रा.स्व.संघ विक्रमादित्य प्रभात शाखेचा मकर संक्रांत उत्सव संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दूरदर्शनवरील मालिकांच्या प्रभावामुळे एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झाल्याचे तसेच कुटुंबाचे जे घटक ग्रामीण भागात आणि शहरात राहतात त्यांच्यात समन्वय नसल्यामुळे बहुतांश ठिकाणी कुटुंबाची वाताहत झालेली पाहायला मिळते अशी माहिति निवृत्त न्यायाधीश मोहन पुराणिक यांनी दिली ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विक्रमादित्य प्रभात शाखेच्या मकर संक्रांत उत्सवात बोलत होते.

विनायक आदर्श हाऊसिंग सोसायटीच्या हनुमान मंदिराच्या प्रांगणात दिनांक २१ जानेवारी रोजी सायंकाळी संपन्न झालेल्या या उत्सवात व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. हिम्मत नरके तसेच हेडगेवार नगर संघचालक अनयजी फणसळकर उपस्थित होते.

मकर संक्रमण उत्सवात बोलताना पुराणिक म्हणाले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने यावर्षीपासून सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन,पर्यावरण, नागरी कर्तव्य आणि स्व- जागरण या पंचसूत्राच्या आधारे आगामी काळात परिवर्तन घडवण्यासाठी काम करायचे आहे असा निर्णय केला आहे. आपणही सर्वांनी या सर्व विषयात झोकून देऊन काम करावे असे आवाहन त्यांनी केले पुराणिक म्हणाले पर्यावरणाच्या बाबतीत एक साधा नियम आपण सर्वांनी पाळला जो सहज शक्य आहे तो म्हणजे बाजारात भाजी घ्यायला जाताना सर्वांनी कापडी पिशवी सोबत ठेवावी जेणेकरून प्लास्टिकचा वापर टाळता येऊ शकेल.

उत्सवाचे प्रमुख अतिथी डॉक्टर हिम्मत नरके यांनी आपल्या भाषणात मकर संक्रांतीचे महत्त्व सांगितले ते म्हणाले केवळ याच काळात गोड बोलावे असे नाही तर नेहमीसाठीच आपल्या सर्वांमध्ये गोडवा आवश्यक आहे आपल्या बोलण्यात गोडवा असेल समाज जोडला जातो समाज जोडला गेला की आपोआप राष्ट्र जोडल्या जाते.

उत्सवाच्या सुरुवातीला विजय मुळे यांनी सांघिक गीत श्रीकांत देशपांडे यांनी अमृतवचन सुभाषित सादर केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजीव जहागीरदार यांनी केले उत्सवाला मोठ्या संख्येत नागरिक आणि महिला उपस्थित होत्या.

# ईव्हीएम हटाव; लोकशाही बचाव!

## (ईव्हीएम मशीन विरोधी आंदोलन विशेष)

सध्या देशभरात निवडणुका होत आहेत. सन २०१४च्या निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशीन्स हॅक करण्यात आल्या होत्या, असा दावा अमेरिकास्थित तंत्रज्ञाने केला. भारताच्या निवडणूक आयोगाने मात्र हा दावा फेटाळून लावला होता. मात्र तरीही या यंत्रांच्या विश्वासार्हतेबद्दल शंका आहे. या मशीन्सच्या कामकाजासंदर्भात तसंच विश्वासार्हतेबद्दल न्यायालयात सात आक्षेप मांडण्यात आले आहेत. मात्र निवडणूक आयोगाने हे आक्षेप मोडून काढत मशीन्समध्ये फेरफार करता येत नाही, असा दावा केला आहे. परंतु यावर विश्वास बसत नाही, यंत्र आहे, त्यात काहीही करामती होऊ शकतात. सर्व पक्ष, संघ, संघटना आणि मतदारराजांनी या अविश्वसनीय यंत्रांवर एकजुटीने एकमुखी बंदी घातलीच पाहिजे. श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा मार्गदर्शक प्रेरणादायी लेख... संपादक




देशातल्या सोळा लाख मतदान यंत्रांमध्ये प्रत्येकी दोन हजार मतांची गणना होते, कारण कोणत्याही मतदान केंद्रावर अधिकृत मतदारांची संख्या दीड हजारांहून जास्त नसते. वीजपुरवठा अनियमित असणाऱ्या ठिकाणीही ही यंत्रे वापरली जाऊ शकतात. प्रशासनातर्फे चालवण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स कंपनीमधील अभियंत्यांनी या यंत्रांची निर्मिती केली आहे. या मशीन्स आणि त्यांचा तपशील याची माहिती अभियंत्यांचा गट सोडला, तर कोणालाही माहिती नाही, असा दावा संबंधितांतर्फे करण्यात येतो. मशीनवरचं बटण दाबून मतदार आपलं मत नोंदवतात. आणखी एका बटणाद्वारे, मतदान अधिकारी मतदानाची प्रक्रिया थांबवू शकतात. मतदानाची वेळ संपल्यानंतर हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. याव्यतिरिक्त मतदान केंद्र ताब्यात घेतल्यास किंवा मतदान प्रक्रियेत बाधा आणल्यास, हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. मतदान यंत्राबरोबर कोणतीही छेडछाड होऊ नये, यासाठी मतदान अधिकारी ते लाखेने सीलबंद करतात. निवडणूक आयोगातर्फे पुरवण्यात आलेल्या खास धाग्याने ते बांधले जाते. याला एक सीरियल नंबर- अनुक्रमांक दिला जातो. आतापर्यंत ईव्हीएम मशीन्स देश पातळीवरील तीन आणि राज्यातल्या ११३ निवडणुकांमध्ये वापरली गेली आहेत.

निवडणुकांत या मशीन्समुळे वेळ वाचतो. एका मतदारसंघातील यंत्रातील मतं तीन ते पाच तासात गणना होऊन निकाल लागू शकतो. कागदी मतपत्रिका असताना यासाठी ४० तास लागत असत. मशीन्समुळे अवैध मतांचा मुद्दा निकाली निघाला आहे. यामुळे होणारा पैशाचा अपव्ययही टळला आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. मशीनमुळेच मतदान प्रक्रियेतले घोटाळे कमी झाले असेही मानले जात आहे. मशीन्सच्या आगम नानंतर मतदान प्रक्रियेतील घोटाळ्यांचं प्रमाण कमी झाल्याचं संशोधनाद्वारे स्पष्ट झालं आहे. मतदान प्रक्रियेतील मानवी चुकांचं प्रमाण कमी होणं लोकशाहीसाठी महत्त्वाचं आहे. शिशिर देबनाथ, मुदित कपूर आणि शमिका रवी या संशोधकांनी सन २०१७च्या निवडणुकांमध्ये मशीन्सचा परिणाम किती याचा अभ्यास केला होता. त्यांच्या अभ्यासात काही बाबी स्पष्ट झाल्या. मशीन्समुळे मतदान प्रक्रियेतील घोटाळ्यांचं प्रमाण कमी झालं आहे. मशीन्सच्या आगमनानंतर गरीब आणि उपेक्षित वर्गाचं मतदानाला उपस्थित राहण्याचं प्रमाण वाढलं आहे. मशीन्सच्या आगमनानंतर मतदानाची प्रक्रिया गतिमान होऊन अंर्तबाह्य बदलली आहे. मशीन्सच्या आगमनानंतर सत्ताधारी पक्षांच्या मतांमध्ये घट झाल्याचं निरीक्षण या अभ्यासगटाने नोंदवलं आहे. मतदान यंत्रांमध्ये कोणतेही फेरफार, गडबड करता येत नाही यावर निवडणूक आयोग ठाम आहे. मॅन्युअली एखाद्याने यंत्रामध्ये फेरफार केली, तर ते टिपता येतं, असं निवडणूक आयोगाचं म्हणणं आहे. निवडणूक आयोगाच्या या दाव्याला राजकीय पक्षांनी सातत्याने आव्हान दिलं आहे. आठ वर्षांपूवी मिशीगन विद्यापीठात एक प्रयोग करण्यात आला. घरगुती स्वरूपाचं उपकरण तयार करण्यात आलं. हे मशीन ईव्हीएमशी जोडण्यात आलं. मोबाईल फोनद्वारे पाठवण्यात आलेल्या टेक्स्ट मेसेजद्वारे मतदान यंत्रात नोंदण्यात आलेलं मत बदलता आलं. भारतीय निवडणूक अधिकाऱ्यांनी या प्रयोगाला फेटाळून लावलं आहे. मशीनचा ताबा मिळवणंही कठीण असल्याचं आयोगाने म्हटलं आहे. सत्ताधारी पक्षाच्या हाताखाली सर्व यंत्रणा, निवडणूक आयोग किंवा तंत्रज्ञमंडळी दबावात येऊन कामे करतात, हे अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे मतदान यंत्रांत फेरफार करणे अशक्य मुळीच नाही. कसं रोखता येऊ शकतं हॅकिंग? हजारो मतदान यंत्रांमध्ये फेरफार घडवून आणण्यासाठी प्रचंड पैसा लागेल, असं मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये कार्यरत धीरज सिन्हा यांनी स्पष्ट केलं असलं तरी मात्र सत्ताधारी पक्षांना ते जड-हलकं काहीच नाही. कारण जाणारा पैसा त्यांच्या बापाच्या खिशातला नसतो. अतोनात खर्च केला, तरी विचारतो कोण त्यांना? कारण आपलीच पोळी भाजून घेण्यात कोणीही कंजूषी करणार नाही. यासाठी मशीन तयार करणारी यंत्रणा आणि मशीन्सचा उपयोग करणारी व्यवस्था हे सहभागी असतील. मशीन्समध्ये फेरफार करण्यासाठी माणसाच्या डोळ्याला दिसणारही नाही असा अँटेना मशीनला बसवणं आवश्यक असते, ही इत्थंभूत प्रक्रिया ते करू शकतात. वायरलेस हॅकिंग रोखण्यासाठी मशीनला रेडिओ रिसीव्हर जोडलेला असणं आवश्यक आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिक सर्किट आणि अँटेना असतो. भारतात वापरल्या जाणाऱ्या मशीन्सला असं सर्किट जोडण्यात आलेलं नाही असं संबंधितांनी सांगितलं. त्यामुळे घाऊक प्रमाणावर भारतातील मतदान यंत्रांमध्ये फेरफार घडवणं अशक्य कोटीची गोष्ट आहे, असे म्हटले जाते. माणसानेच यंत्र तयार केले, त्यातील बिघाड तोच दुरूस्त करू शकतो किंवा चांगल्यात बिघाडही तोच आणू शकतो. मग पाहिजे तसा बदलही त्यात का घडवून आणू शकणार नाही.

निवडणूक आयोगाची प्रमुखमंडळी काय सांगतात? पेपर ट्रेल स्लिप आणि इलेक्ट्रॉनिक मशीनमध्ये नोंदली गेलेली मतं यांची तुलना किमान पाच मतदान केंद्रांमध्ये केली जाते. पेपर ट्रेलचा ताळेबंद ठेवणं हे खर्चिक आणि वेळखाऊ आहे. संशोधकांनी धोका कमीत कमी राहील असं लेखापरीक्षण सुचवलं आहे. तूर्तास पेपर ट्रेल व्यवस्थेमुळे मतदार आणि राजकीय पक्षांनी निर्धोक राहावे, असं निवडणूक आयोगाचे माजी प्रमुख एस.वाय.कुरेशी यांनी सांगितलं आहे. सन २०१५पासून सर्व राज्यातील निवडणुकांमध्ये पेपर ट्रेलचा वापर करण्यात आला आहे. दीड हजार मशीन्सच्या माध्यमातून तयार झालेल्या पेपर ट्रेल्सची मोजदाद करण्यात आली. पेपर ट्रेल आणि प्रत्यक्ष मतं यांचा तौलनिक अभ्यास करण्यात आला. यामध्ये एकातही गडबड आढळली नसल्याचं कुरेशी यांनी सांगितलं. ईव्हीएमबाबत मतदारांमध्ये नेहमी कुतूहल तर विरोधकांमध्ये नेहमी संशयच राहिला आहे. पण खरंच ईव्हीएम हॅक होऊ शकतात का?होय, केल्या जाऊ शकतात. याचा वेध बीबीसी प्रतिनिधी सौतिक बिस्वास यांनीही घेतला. मागील एका निवडणुकीत कोणत्याही उमेदवारास मत टाकले, तरी ते अमुक एकाच चिन्हावर अंकित झाल्याची मतदारांत कुजबुज दिसून आली, हे सत्य कसं काय असू शकत नाही? आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मत मिळालं याची खात्री करतांना समजून आले. आपण मतदान केलं, पण ते अन्यत्रच गेलं. म्हणून ऐंशी कोटी मतदार आणि जवळपास दोन हजार राजकीय पक्ष या प्रचंड पसाऱ्यामुळे देशात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका ही एक गुंतागुंताची प्रकिया बनली आहे, हे उघड आहे. या किचकट आणि आव्हानात्मक प्रक्रियेत मतदार हा केंद्रस्थानी आहे. मतांचं पावित्र्य हा सगळ्यांत संवेदनशील मुद्दा आहे. त्यामुळे मतदारांच्या मागणीचा व भावनांचा विचार प्राधान्याने केला गेला पाहिजे, असे वाटते. काही वर्षांपूर्वीपर्यंत कार्यकर्त्यांनी मतदान केंद्रं ताब्यात घेणं आणि मतपेट्यांमध्ये फेरफार करणं हे चित्र आपल्याला दिसत होतं. तेच चित्र गुप्तमार्गांनी उभे होत आहेत, असे का वाटू नये? ईव्हीएम मशीनच्या आगमनाने या पारंपरिक चित्राला छेद मिळाला. मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होऊ लागलं. मात्र आता ही निर्जीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रं वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत, हेच खरे! ईव्हीएम हॅकिंगचा आरोप का होतो? पराभूत होणारे पक्ष नेहमीच ईव्हीएम मशीन्स हॅक करण्यात आली असून, मतांमध्ये फेरफार झाला आहे, असा आरोप करताना दिसतात. निवडणुकीत ईव्हीएम मशीनमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप करत बहुजन समाज पार्टी भिवंडी तालुका अध्यक्ष कैलास गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी भिवंडीत उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करून ईव्हीएम मशीन विरोधात निदर्शने करण्यात आली. सर्वत्र अशीच निदर्शने केली जावीत. भ्रष्टाचार आज शिष्टाचार झाला आहे. अधिकारी तंत्रज्ञान मंडळी चिरीमिरी घेऊन हवे ते बदल करू शकतात. खूप खर्च आला तरी तो सरकारी तिजोरीतून केला जातो. ईव्हीएम यंत्र बाद करून होणारा खर्च बॅलेटपेपरवर केल्यास तो अधिक लाभदायक ठरेल. मतमोजणीत व इतर ठिकाणी खर्च होणारा पैसा सत्कारणी लागेल, तो कुठल्याही चोर, भष्टाचारी, विघ्नसंतोषी, कावेबाज, देशद्रोही व्यक्तीच्या घस्यांत पडणार नाही, तर जनतेच्या आर्थिक समस्या दूर करण्यात अर्थात छोट्या कर्मचाऱ्यांच्या खिशात पडेल. निवडणूक पारदर्शक झाल्याचा समाधान राहील, या विश्वासार्ह प्रक्रियेमुळे मतदारांना वेळोंवेळी पस्तावत जाण्याची नौबतच येणार नाही. भारतात ईव्हीएम मशीन हॅक करून त्यामध्ये फेरफार केल्याचा आरोप होत असून त्याच्याजिवावर भाजपा निवडणुका जिंकून देशात हुकूमशाही पद्धती अवलंबू पहात आहे. पुढे जाऊन निवडणुकीचा अवास्तव खर्च टाळण्यासाठी निवडणुकाच रद्दबातल करू शकेल. म्हणून त्याचा सर्वच राजकीय पक्ष विरोध करीत असून त्यावर बहुजन समाज पार्टी संपूर्ण देशभर आंदोलन करीत आहेत, हे योग्यच आहे. अशी माहिती कैलास गायकवाड यांनी दिली आहे. उप विभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केल्यानंतर उपविभागीय अधिकारी अमित सानप यांना मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या नावे असलेले आपल्या मागण्यांचे निवेदन यावेळी दिले आहे. यासंदर्भातील निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे बेरोजगारांची संख्या वाढली आहे. युवकांच्या समस्या सोडविण्याबाबत उदासीनता बाळगण्यात येत आहे. निवडणुकीत वापरली जाणारी इव्हीएम मशीनही पारदर्शक नसल्याचा आरोप भारतीय युवा व बेरोजगार मोर्चाने केला आहे. कोरोना काळापासून आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यावर उपाय म्हणून सतत बंद पाळला जात असल्याने बेरोजगारीत वाढ झाली आहे. एनसीआरबीच्या अहवालानुसार देशात प्रत्येक दिवसाला ३८ बेरोजगार आत्महत्या करत आहेत. त्यास शासनाचे चुकीचे धोरण कारणीभूत असल्याचा मुद्दा समोर करून भारतीय बेरोजगार मोर्चाने आंदोलन पुकारले असून दुसऱ्या टप्प्यात 'इव्हीएम मशीनची प्रतिमा जलाओ!' आंदोलन करण्यात आले,

देशातील राज्यांच्या विधानसभा पार पडल्या. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ, तेलंगणा या राज्यांच्या निवडणुकींचा निकाल जाहीर झाला. या निवडणुकांची मतमोजणी ज्या मशिनद्वारे केली जाते. ते मशिन म्हणजे ईव्हीएम- इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन होय. मध्यंतरी या ईव्हीएम मशिनमुळे चांगलाच वाद-विवाद रंगला होता. त्यामुळे, हे ईव्हीएम मशिन चांगलेच चर्चेत आले होते. ते आता तात्काळ हटविले गेले पाहिजे, नेहमी होणाऱ्या वादंगाला कायमचा लगाम घालायलाच हवा. परंतु, आपणास या भ्रष्टाचारी ईव्हीएम मशिनचा इतिहास माहित आहे का? या मशिनचा वापर सर्वात आधी कुठे करण्यात आला होता? या संदर्भातली रंजक माहिती... ईव्हीएम मशिनचा इतिहास- भारतात पहिल्यांदा या ईव्हीएम मशिनचा शोध हा १९८०मध्ये लावण्यात आला होता. एम.बी.हनिफा यांनी या मशिनचा शोध लावला होता. हनिफा यांनी १५ ऑक्टोबर १९८० रोजी इलेक्ट्रॉनिकली ऑपरेटेड व्होट काऊंटिंग मशिन म्हणून याची नोंदणी केली होती. एम.बी.हनिफा यांनी एकात्मिक सर्किट्सचा वापर करून मूळ ईव्हीएम मशिन डिझाईन केले होते. हे ईव्हीएम मशिन त्यावेळी तामिळनाडूच्या ६ शहरांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सरकारी प्रदर्शनात जनतेसाठी ठेवण्यात आले होते. त्यावेळी लोकांनी सर्वात आधी हे ईव्हीएम मशिन पाहिले होते. त्यानंतर निवडणूक आयोगाने याचा वापर करण्याचा विचार केला. सन १९८९मध्ये भारतातील ईव्हीएम मशिनचे उत्पादन भारतीय निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या सहकार्याने सुरू केले. ईव्हीएमचे औद्योगिक डिझायनर औद्योगिक डिझाईन सेंटर- आइआइटी बॉम्बेचे फॅकल्टी सदस्य होते. देशात ईव्हीएम मशिनचा वापर हा सर्वात आधी १९८२मध्ये मे महिन्यात करण्यात आला होता. त्यावेळी केरळच्या परावूर विधानसभेतील ५० मतदान केंद्रांवर या मशिनचा वापर करण्यात आला होता. मात्र त्यानंतर एका उमेदवाराने निवडणुकीतील त्याच्या पराभवाचे श्रेय हे ईव्हीएम मशिनलाच दिले होते. त्या उमेदवाराचे नाव एस.सी.जोस असे होते. जोस यांनी ईव्हीएम मशिनचा निवडणुकीत करण्यात आलेला वापर आणि निकालांना न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर कोर्टाने पुन्हा निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते. मात्र न्यायालयाने ईव्हीएम मशिनमध्ये कोणताही बिघाड झाल्याचा संशय व्यक्त केला नव्हता.

काही काळापर्यंत या मशिनचा वापर करण्यात आला नव्हता. देशात ईव्हीएम मशिनचा वापर सुरू झाला मात्र १९८३नंतर काही वर्षांपर्यंत ईव्हीएमचा वापर करण्यात आला नव्हता. सर्वोच्च न्यायालयाने यासाठी कायदेशीर तरतूद करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सन १९८८मध्ये डिसेंबर महिन्यात संसदेत कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि लोकप्रतिनिधी कायदा १९५१मध्ये कलम ६१-अ जोडण्यात आले. ज्या अंतर्गत निवडणूक आयोगाला मतदान यंत्र वापरण्याचा अधिकार प्राप्त झाला. ज्या ईव्हीएम मशिनची निर्मिती १९८९-९०च्या दरम्यान करण्यात आली होती, त्यांचा वापर नोव्हेंबर १९९८च्या विधानसभा निवडणुकीत करण्यात आला होता. या मशिनचा प्रयोग म्हणून वापर हा मध्यप्रदेशातील ५, राजस्थानच्या ६ आणि दिल्लीतील ६ विधानसभा मतदारसंघात करण्यात आला होता. परंतु सन २००४नंतर सर्व निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशिनचा वापर केला जाऊ लागला. तो आजतागायत सुरू आहे. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि मतदार यांनी मतदान यंत्र- इव्हीएम हटाव करीता एकमुखी जोरदार उठाव केल्यास ते शक्य आहे. इव्हीएमचे कोणी बांधील नाही. मतदारांसाठी विश्वासार्ह निवडणूक पद्धती केव्हाही चांगलीच! तीच खरी लोकशाहीची आण, बाण व शान ठरेल.

!! एकच नारा: ईव्हीएम व्हीव्हीपॅट सोडा; मतदारांची खद्दू मने जोडा! पारदर्शक निवडणुकीचा हाच फंडा !! एकच आस मनी धरा- आहे भारतीय पावन धरा; आधी ईव्हीएममुक्त करा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

# महाराष्ट्रातील घुसखोरांवर कायदेशीर कारवाई करा- गृहमंत्रालय

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रात बेकायदेशीर घुसखोरांवर कडक कारवाई करा असे निर्देश केंद्रीय गृह मंत्रालयाने दिले आहेत. महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि इतर संबंधित संस्थांना बांगलादेश आणि म्यानमारमधून महाराष्ट्रात येणाऱ्या घुसखोरांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात शिवसेना (शिंदे गट) उपनेते आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांनी अमित शाह यांच्याकडे बांगलादेशी घुसखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. या मागणीच्या आधारे गृह मंत्रालयाने सैफ अली खानवरील हल्ल्यानंतर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जारी केले आहेत. राहुल शेवाळे यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये केंद्रीय गृहमंत्र्यांना पत्र लिहीले होते.

यात टाटा सोशल सायन्स इन्स्टिट्यूटच्या अहवालाचा हवाला देत महाराष्ट्र आणि मुंबईत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. टाटा इन्स्टिट्यूटने त्यांच्या अहवालात म्हटले होते की, बांगलादेशी घुसखोर मुंबई आणि राज्याच्या इतर भागात बेकायदेशीरपणे वास्तव्याला आहेत. हे घुसखोर गुन्हेगारी कारवायांमध्ये सामील होऊ शकतात, ज्यामुळे मुंबईच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. काही ठिकाणी त्यांना बनावट मतदार ओळखपत्र देऊन मतदार बनवले जात आहे, जे लोकशाहीला धोका निर्माण करू शकते, असेही या अहवालात म्हटले आहे. दरम्यान, या धोक्याची झलक सैफ अली खानवरील हल्ल्याच्या माध्यमातून दिसून आली. अभिनेता सैफ अली खानवर त्याच्या राहत्या घरी चाकूने हल्ला केल्याच्या आरोपाखाली एका बांगलादेशी नागरिकाला अटक करण्यात आली. पोलिसांनी सांगितले की, प्राथमिक तपासात असे दिसून आले की, त्या व्यक्तीला आपण एका बॉलिवूड स्टारच्या घरात घुसलो आहोत याची माहिती नव्हती. त्याचा हेतू चोरी करण्याचा होता. हल्लेखोराला ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर रोडवरील हिरानंदानी इस्टेट येथून अटक करण्यात आली. भारतात प्रवेश केल्यानंतर, त्या व्यक्तीने त्याचे नाव शरीफुल इस्लाम शहजाद मोहम्मद रोहिल्ला अमीन फकीर वरून विजय दास असे बदलले. आरोपी, मूळचा बांगलादेशातील झलोकाटीचा रहिवासी असूमन गेल्या ८ महिन्यांपासून मुंबईत राहत होता.

# जगद्गुरू नरेंद्रचार्यजी महाराज संस्थानने केली १६ दिवसात विश्व विक्रमी रक्तदानाची नोंद

**प्रकाश खजिनकर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जगद्गुरू श्री.स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान दक्षिण पीठ नाणिजधाम यांच्या प्रेरणेने दरवर्षी रक्तदान महायज्ञ शिबिराचे आयोजन केले जाते. प्रति वर्ष प्रमाणे दि.४ जानेवारी २०२५ ते १९ जानेवारी २०२५ या दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात सांप्रदायाच्या वतीने विविध ठिकाणी रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.

त्यामध्ये महाराष्ट्रातील सिकलसेल,ॲनिमिया, हेमोफिलिया,ब्लड कॅन्सर, किडनी फेल्युअर पेशंट जास्त आढळतात.अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत गरज भासते.या लोककल्याणासाठी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थांच्या वतीने घेण्यात



आलेल्या या रक्तदान महायज्ञ शिबिरामध्ये संपूर्ण शिबिरामध्ये १,३६,२७० रक्तकूपिका संकलित करून महाराष्ट्र शासनाच्या रक्त संकलित करणाऱ्या रक्तपेढ्यांकडे हे रक्त कुपिका जमा करण्यात आल्या.

या आयोजित शिबिरामध्ये सर्व संतसंग सेवा केंद्राचे अभिनंदन करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे सदरील शिबिरामध्ये महिलांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद पाहायला मिळाला. सदरील रक्तदान महायज्ञ शिबिरासाठी स्व-स्वरूप सांप्रदायाचे आजी-माजी पदाधिकारी, भक्त, साधक, शिष्य,हितचिंतक यांनी विशेष परिश्रम करून जगद्गुरू श्रींच्या सामाजिक सेवेमध्ये सहभाग घेतला. रक्तदान शिबिरास जिल्हा सेवा समिती, तालुका सेवा समिती पदाधिकारी यांच्यासह राजकीय आणि विविध क्षेत्रातील सामाजिक सेवा करणाऱ्या मान्यवरांनी रक्तदान शिबिरास भेट देऊन जगद्गुरू श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानचे या अभियानाचे विशेष कौतुक करून पुढील येणाऱ्या सामाजिक अभियानासाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या वतीने देशव्यापी महारक्तदान शिबिराचे आयोजन




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती सभाजीनगर, ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स (AIOCD) आणि महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट्स असोसिएशन यांच्या वतीने मा. श्री. जगन्नाथजी उर्फ आप्पासाहेब सखाराम शिंदे यांच्या ७५व्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून २४ जानेवारी २०२५ रोजी भव्य देशव्यापी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर महारक्तदान शिबिर देशभरातील केमिस्ट्सच्या नेतृत्वाखाली विविध ठिकाणी आयोजित केले जाईल. यामध्ये एकाच दिवशी ७५,००० रक्तदात्यांकडून रक्तसंकलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

एक देश, एक व्यक्ती, एक दृष्टिकोन एक रक्तदान या घोषवाक्याखाली हे शिबिर राबवले जात असून, रुग्णांना जीवनदान देण्याचा हा सामाजिक उपक्रम अत्यंत प्रेरणादायक ठरेल.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आयोजन औरंगाबाद जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. नितीन देशमुख आणि सचिव श्री. विनोद लोहाडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात विविध ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. समाजसेवेच्या या पवित्र कार्यात जिल्ह्यातील फार्मासिस्ट मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत आहेत.

अध्यक्ष नितीन देशमुख सचिव विनोद लोहाडे नंदलाल काळे, कोषाध्यक्ष निखिल सारडा, सचिन मुगदिया, वसंत भराड, रईसभाई, हरीश काबरा, सुनील देशमुख, संजय लोढा, कपिल टिबडीवाला, इजाज भाई, दीपक भारतीया आदींची पत्रकार परिषदेत उपस्थिती होती. रक्तदान शिबिर हे औषधी भवन गुलमंडी टीव्ही सेंटर, मराठा क्रांती बहुउद्देशीय संस्था, जळगाव रोड, शहा बाजार, कुरेशी फंक्शन हॉल, कुरेशी हॉस्पिटलसमोर लायन्स बाल सदन, चिकलठाणा सिविल हॉस्पिटल मिनी घाटी, गारखेडा श्री दंत मेडिकल, जिजाई हॉस्पिटल, खडकेश्वर महादेव मंदिर, ग्रामीण हॉस्पिटल सिल्लोड, बी झेड पी कॉम्प्लेक्स, रेमंड शोरूम रोड कन्नड, वसंत क्लब, डेपो रोड, राजेश मेडिकल वैजापूर, पुष्पाजली हॉस्पिटल डॉ. नंदकिशोर उदावंत, गव्हर्मेंट हॉस्पिटल दायगाव रोड लासुर स्टेशन, शिवाजी पुतळाजवळ अवनी मेडिकल पैठण, ऋतुजा मेडिकल जवळ सोयगाव घृष्णेश्वर हॉस्पिटल, महाराणा प्रताप चौक बजाज नगर, ग्रामीण हॉस्पिटल महावीर मेडिकल समोर पाचोड, कोकण वेस हनुमान मंदिर समोर बिडकीन येथे महा रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

# धेय्य गाठण्यासाठी श्री ज्ञानेश्वर माऊली समग्र कळावेत-ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जन्मल्यापासून संजीवन समाधी घेईपर्यंत म्हणजे आयुष्यभर अफाट अडी अडचणींना तोंड देत जगाला ज्ञानाचा प्रकाश देण्याचा व उचित क्षेत्रात उदिदष्ट प्राप्ती गाठता येण्यासाठी प्रेरणा देणारा मार्ग दाखवणारे संत श्री ज्ञानेश्वर माऊली समग्र जाणून घ्यायला हवेत, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

धार्मिक सोहळा सप्ताहनिमित्त आयोजित कार्यक्रमात श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचे समग्र जीवन या विषयावर बोलतांना ते म्हणाले की, ज्ञानदेवांसारखा छळ कदाचित इतर कोणाचा झाला असेल. असे असले तरीही विश्वकल्याणाचे स्वप्न श्री ज्ञानेश्वरांनी सद्गुरू निवृत्तीनाथांच्या कृपाशीर्वादाने श्रीज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, हरिपाठ, स्फुट अभंग, अमृतानुभव या साहित्याच्या माध्यमातून पूर्णत्वास नेले.



कितीही अडचणी आल्या तरी आपण ठरवलेल्या धेय्यापर्यंत आपण जाऊ शकतो, अशी जबरदस्त जीवन प्रेरणा श्री निवृत्तीनाथांचे शिष्य व धाकटे बंधू आणि वारकरी सांप्रदायाचे आधारस्तंभ श्री ज्ञानदेवांचे जीवन कार्य आम्हाला देते. छोटया मोठया अडथळयांना तसेच अडचणींना भयंकर मोठे मानून हार मानणारे लोक समाजात मोठया प्रमाणावर आहेत. त्यामुळे विद्यार्थी असो की तरुण, वृध्द असो, त्यांनी ज्ञानदेवांच समग्र जीवन जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर निश्चितच प्रेरणा मिळेल हे आपण स्वानुभवातून सांगत असल्याचे फड म्हणाले.

ज्याला श्री ज्ञानदेव समग्र जाणून घेता येणे शक्य वाटत नाही, त्यांनी संत चोखोबांच्या, चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ । वाचिता सनाथ होती जीव ।।, संत जनाबाईच्या, वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी ।।, आणि संत नामदेवांच्या, नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ।। या अभंगाप्रमाणे हा ग्रंथ अनुभवावा, असेही फड म्हणाले. समग्र ज्ञानेश्वर माऊली सार या विषयावर अडीच तास डॉ. फड यांनी प्रवचन केले.

हा कार्यक्रम अत्यंत उत्तम व खूप समाधान कारक झाल्याचे संयोजकांनी तसेच उपस्थित अनेक भाविकांनी म्हटले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, कृष्णा महाराज घायट, अशोक भिंगारे, तुकाराम चव्हाण, कृष्णा महाराज आरगडे, काकासाहेब देवडे, चैतन्य पडूळ, माधव पित्तरवाड, भगवान पाटील, राजू पडूळ, कु. दामीनी देवडे तसेच शिवपार्वती महिला भजनी मंडळ यांनी पुढाकार घेतला होता.

# 'हर जोर जुल्म की टक्कर में संघर्ष हमारा नारा है'

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कंत्राटी कामगार संघटनेच्या वतीने बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय व ठेकेदारांकडून होणाऱ्या आर्थिक पिळवणुकी बाबत महावितरण कंपनी प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे अन्याय व कायदयाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्याच्या व ठेकेदाराच्या विरुध्द दिनांक १०/०२/२०२५ रोजी आपल्या कार्यालयासमोर गेटवर मिलकॉर्नर, छ. संभाजीनर येथे सकाळी ११.०० वाजेपासुन संघटनेचे पदाधिकारी आमरण उपोषण करणार आहे.

ठेकेदाराकडून एकाही आउटसोर्स कर्मचाऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही, तसेच ठेकेदारांची दादागिरी व कायदयाचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही, कृपया मराठवाड्यातील सर्व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी जागृत होऊन वरील अन्याय विरुद्ध एकजूट होऊन लढा द्यावा. श्री प्रदीप शिवनारायण जैस्वाल आमदार, अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कंत्राटी कामगार संघटना, श्री हाजी सय्यद जहिरोद्दीन सरचिटणीस - महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कंत्राटी कामगार संघटना, श्री.सजेद हमीद खान - (मियाभाई), कार्याध्यक्ष - महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कंत्राटी कामगार संघटना, अजिज पठाण, केंद्रीय अध्यक्ष - महापारेषण विंग तथा उपाध्यक्ष - महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कंत्राटी कामगार संघटना.

# जेडीयूने पाठिंबा काढला आता भाजपा भाकरी फिरवणार, मणिपूरचा मुख्यमंत्री बदलणार ?

**इंफाळ :** केंद्रात मोदी सरकारला पाठिंबा देणाऱ्या आणि बिहारमध्ये भाजपाच्या पाठिंब्याने सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जनता दल संयुक्त पक्षाने एक चकीत करणारी कृती केली आहे. जदयूने मणिपूरमधील भाजपा सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. मणिपूरमध्ये जदयूचा फक्त एक आमदार आहे. हा आमदार आधी सत्ताधाऱ्यांसोबत बसायचा आता तो विरोधी बाकावर बसेल. जनता दल संयुक्तच्या या निर्णयामुळे मणिपूरमधील भाजपा सरकारच्या स्थैर्यावर परिणाम होणार नाही. पण मुख्यमंत्री नोंगथोंबाम बिरेन सिंह (एन. बिरेन सिंह) यांच्या विरोधातील नाराजी वाढल्याचा आणखी एक राजकीय संकेत आहे. ताज्या घडामोडीचे निमित्त करुन भारतीय जनता पार्टी मणिपूरमध्ये मुख्यमंत्री बदलण्याचा विचार करण्याची शक्यता आहे.

मणिपूरमध्ये ६० सदस्यांची विधानसभा आहेत. या सभागृहात रालोआचे ४५ आमदार आहेत. यात भाजपाचे ३७, नागा पीपल्स फ्रंटचे पाच आणि तीन अपक्ष आमदार आहेत. तर विरोधात फक्त १४ आमदार आहेत. यात नॅशनल पीपल्स पार्टीचे सहा, काँग्रेसचे पाच, कुकी पीपल्स अलायन्सचे दोन आणि जनता दल संयुक्तचा एक आमदार आहेत. सभागृहातील एक जागा रिक्त आहे.

मणिपूर विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक २०२२ मध्ये झाली. या निवडणुकीत जनता दल संयुक्तने सहा जागांवर विजय मिळवला. पण निवडणुकीनंतर काही महिन्यांतच जनता दल संयुक्तच्या पाच आमदारांनी भाजपात प्रवेश केला. यामुळे भाजपाच्या आमदारांची संख्या ३७ वर जाऊन पोहोचली. या घटनेनंतरही जनता दल संयुक्तने मणिपूरमध्ये भाजपा सरकारचा पाठिंबा काढला नव्हता. पण आता जनता दल संयुक्तने विरोधात बसण्याचा निर्णय घेतला आहे. मणिपूर जनता दल संयुक्तचे प्रमुख क्षेत्रीमायुम बिरेन सिंह (के. बिरेन सिंह) यांनी राज्यपाल अजय कुमार भल्ला यांना पत्र पाठवून पक्षाने विरोधात बसण्याचा निर्णय घेतल्याचे कळवले आहे.

माजी केंद्रीय गृहसचिव असलेल्या अजय कुमार भल्ला यांनी ३ जानेवारी २०२५ रोजी मणिपूरच्या राज्यपालपदाचा पदभार स्वीकारला. यानंतर काही दिवसांनी जनता दल संयुक्तने मणिपूर सरकारचा पाठिंबा काढल्याचे जाहीर केले आहे. जनता दल संयुक्तच्या निर्णयामुळे मणिपूरमधील सरकारच्या स्थैर्यावर परिणाम होणार नाही. बिहार आणि केंद्रात जनता दल संयुक्त आणि भाजपा आजही एकत्र आहेत आणि या दोन्ही ठिकाणी वेगळा विचार करत असल्याचे संकेत जनता दल संयुक्तने दिलेले नाहीत. यामुळे जनता दल संयुक्तचा मणिपूरमधील निर्णय हा मुख्यमंत्र्यांविषयीच्या नाराजीतून आल्याची चर्चा आहे.

मेघालयमध्ये सत्तेत असलेल्या नॅशनल्स पीपल्स पार्टीने मणिपूरमध्ये सत्ता स्थापनेवेळी नोंगथोंबाम बिरेन सिंह (एन. बिरेन सिंह) यांच्या सरकारला पाठिंबा जाहीर केला होता.

पण नोव्हेंबर २०२४ मध्ये नॅशनल्स पीपल्स पार्टीने पाठिंबा काढून घेत विरोधात बसण्याचा निर्णय घेतला. मेघालयमध्ये नॅशनल्स पीपल्स पार्टीचे ३२, युनायटेड डेमोक्रॅटिक पार्टीचे १२, भाजपाचे दोन, हील्स स्टेट पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीचे दोन आणि दोन अपक्ष असे ५० आमदार एकत्र आले आणि सरकार स्थापन झाले. या समीकरणात कोणताही बदल झाला नसताना नॅशनल्स पीपल्स पार्टीने मणिपूरमधील नोंगथोंबाम बिरेन सिंह (एन. बिरेन सिंह) यांच्या सरकारचा पाठिंबा काढून घेतला.

या घटनेला दोन महिने उलटत नाहीत तोच जनता दल संयुक्तने मणिपूरमधील नोंगथोंबाम बिरेन सिंह (एन. बिरेन सिंह) यांच्या सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. हे करताना जनता दल संयुक्तने भाजपासोबतची इतर कोणतीही राजकीय समीकरणे बदलेली नाहीत. यामुळे नॅशनल्स पीपल्स पार्टी आणि जनता दल संयुक्त यांचे मणिपूरमधील निर्णय हे मुख्यमंत्र्यांच्या कारभाराविषयी नाराजी प्रकट करण्यापुरतेच मर्यादीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा मणिपूरमध्ये मुख्यमंत्री बदलण्याचा विचार करेल, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# एसटी बसस्थानकांवर 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान' राबविणार..! - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई : स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त २३ जानेवारी रोजी पुढील वर्षभर एसटीच्या राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबवण्यात येणार आहे. तब्बल ३ कोटी रुपयांची बक्षिसे या अभियानांतर्गत देण्यात येणार असून राज्यात ' अ ' वर्गात पहिला येणाऱ्या बसस्थानकाला १ कोटीचे बक्षीस जाहीर करण्यात येत आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. या अभियानाचा शुभारंभ २३ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांच्याहस्ते कुर्ला नेहरूनगर बसस्थानकावर सकाळी ११ वाजता होणार आहे. यानिमित्ताने सर्व राज्यभर प्रत्येक बसस्थानकावर शालेय विद्यार्थी, सामाजिक संस्था व एसटी कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

मागील वर्षी हे अभियान सुरू करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अभियानाची संकल्पना विषद करताना, सर्वसामान्य प्रवाशांना स्वच्छ व सुंदर बसस्थानक तसेच निर्जंतूक , टापटीप प्रसाधनगृहे कायमस्वरूपी उपलब्ध करून देणे हे एस. टी. महामंडळाचे प्रथम कर्तव्य आहे. या जाणिवेतून हे अभियान सुरू करण्यात येत आहे, असे स्पष्ट केले होते.

तसेच आपलं गाव, आपलं बसस्थानक ‖ या संकल्पनेवर आधारित लोकसहभागातून बसस्थानकांचा सर्वांगीण विकास करणे हा या अभियानाचा मुख्य ‖ गाभा ‖ राहणार आहे. हे देखील आवर्जून सांगितले होते. अर्थात, कोणतेही बसस्थानक हे त्या गावचे मध्यवर्ती ठिकाण असते. त्याअर्थाने बसस्थानक हे त्या गावची ‖ शान ‖ असल्यामुळे गावातील तरुण मंडळे, महिला बचत गट, विविध सामाजिक संस्था, उद्योग समूह यांनी पुढे येऊन त्या बसस्थानकाचे सुशोभीकरण आणि सौंदर्यीकरणासाठी मदत करावी, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे. वर्षभर चालणाऱ्या या अभियानामध्ये दर ३ महिन्यांनी प्रत्येक बसस्थानकाचे मूल्यमापन होणार आहे. त्यासाठी एस.टी. महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली परीक्षण समित्या नेमण्यात आल्या असून त्यांनी दिलेल्या गुणांच्या आधारे सरासरीद्वारे बसस्थानकाचे क्रमांक निश्चित करण्यात येतील.

राज्यभरात एसटीच्या असलेल्या सर्व बसस्थानकाचे तेथील प्रवासी चढ-उतार संख्येच्या आधारे शहरी ' अ ' वर्ग, निमशहरी ' ब ' वर्ग व ग्रामीण ' क ' वर्ग अशा तीन गटांमध्ये विभागणी केलेली आहे. प्रथम प्रादेशिक स्तरावर प्रत्येक गटनिहाय पहिला, दुसरा आणि तिसऱ्या क्रमांकासाठी स्पर्धा रंगणार असून अंतिम स्पर्धा राज्यस्तरावर घेण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक प्रादेशिक स्तरावर गटनिहाय पहिला आलेल्या बसस्थानकाचा विचार केला जाणार आहे.

राज्यपातळीवर ' अ 'वर्ग गटातून पहिला येणाऱ्या बसस्थानकाला १ कोटी रुपये ' ब ' वर्ग गटातून पहिला येणाऱ्या बसस्थानकाला ५० लाख रुपये तर ' क ' वर्ग गटातून पहिला येणाऱ्या बसस्थानकाला २५ लाख रुपये इतक्या रकमेची बक्षिसे देण्यात येणार आहेत.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**